## वादीतर्फे साक्षीदार क्र.३ यांचा शपथेवरील उलटतपास प्रतिवादींतर्फे वकील श्री. चांदोरकर यांच्याकडून

०५. मी इयत्ता ७ वी पर्यंत शिकलो आहे. वादी हे माझे चुलतभाऊ आहेत. वादी व माझ्यामध्ये ४ ते ५ वर्षांच्या वयाचे अंतर आहे. वादी क्र.१ हा माझ्यापेक्षा मोठा आहे व वादी क्र.२ हा माझ्यापेक्षा छोटा आहे. मी वादी क्र.१ यास दादा म्हणुन हाक मारतो. वादी यांच्या कुटूंबाशी माझे चांगले संबंध आहेत. वादी यांच्या वडीलांनी दावा मिळकत कधी विकत घेण्याचे ठरविले व कधी विकत घेतली हे मला माहीत नाही. भागोजी रामजी कदम यांनी सन १९८७ मध्ये धोंडू लक्ष्मण कदम यांच्याकडून दावा विषयाचे त्यांचे घर व बाजुची मोकळी अशी बिनशेती जमीन खरेदी घेतली होती व आहे हे मला ऐकुन माहीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वर नमुद हकीगत मला वादी क्र.१ ने सांगितल्याप्रमाणे मला माहीत आहे.

प्रश्न – दावा मिळकतीचा सर्वे नंबर तुम्हाला सांगता येईल काय ?

उत्तर – दावा मिळकतीचा सर्वे नंबर २६/ब व गट नंबर ७६५.

०६. धोंडू लक्ष्मण कदम यांच्याकडून भागोजी रामजी कदम यांनी दावा मिळकतीमधील जे घर विकत घेतले असे माझ्या शपथपत्रामध्ये नमुद आहे त्या घराचा नंबर मला सांगता येणार नाही. पार्वती कदम यांनी ज्या घराचे बांधकाम अतिक्रमण करुन केले आहे असे आमचे म्हणणे आहे त्या घराचा नंबर मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.१ यांचा कब्जा व मालकी नव्हती हे मी खोटे सांगतो.

०७. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ सहा वर्षांपुर्वी वादीच्या घरालगत पश्चिम बाजुस असणाऱ्या खुल्या मोकळया जागेत अतिक्रमण करुन बांधकाम करतेवेळी वादीने त्यास तक्रार व हरकत केली होती व त्यावेळी त्यांच्या दरम्यान झालेल्या वादावेळी मी हजर होतो हे मी खोटे सांगतो. वादीने त्यावेळी सदर वादाबाबत तक्रार केली होती. वादीने साक्ष द्यावयाची सांगितली त्याप्रमाणे मी आलो. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यामध्ये काय साक्ष द्यायची हे मला वादीने सांगितले त्याप्रमाणे मी साक्ष दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी माझा चुलतभाऊ आहे त्यामुळे मी खोटी साक्ष देत आहे.

**फेरतपास नाही.**
**उलटतपास पुर्ण.**

माझे समक्ष नोंदविले.
श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-
(**एस. एस. पाटील**)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, महाड

महाड
दिनांक – ०७/१२/२०२२